दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २५ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २१० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, नवमी संध्याकाळी ६-२९ पर्यंत, दिवस नक्षत्र– आश्लेषा रात्री ८-०५ पर्यंत चंद्र रास - कर्क रात्री ८-०५ पर्यंत नंतर सिंह, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### संजय गायकवाडांची माघार!

**मुंबई:** शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या वादावरून निर्माण झालेल्या प्रकरणात शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी अखेर दिलगिरी व्यक्त केली आहे. प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ केल्याबद्दल त्यांनी माफी मागितली असली, तरी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मानपूर्वक उल्लेख व्हावा, या भूमिकेवर आपली भूमिका कायम असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले आहे.

## सारांश वृत्त

### पाकिस्तानी घुसखोराला अटक

**बुलंदशहर (उत्तर प्रदेश) :** येथे बेकायदेशीरपणे राहत असल्याच्या संशयावरून पोलिसांनी एका पाकिस्तानी नागरिकाला अटक केली असून, त्याच्यावर बनावट ओळखपत्रांचा वापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. संशय आणि माहितीच्या आधारे केलेल्या तपासणी मोहिमेदरम्यान कोतवाली नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नुमैश पुलाजवळ आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

### जीपीएस आधारित ऊस पीक सर्वेक्षण

**लखनौ :** उत्तर प्रदेश सरकार २०२६-२७ च्या गाळप हंगामासाठी १ मे ते ३० जून या कालावधीत राज्यभरातील ऊस पिकांचे जीपीएस-आधारित सर्वेक्षण करणार असून, नोंदणीकृत शेतकऱ्यांना याची आगाऊ माहिती एसएमएसद्वारे दिली जाईल, असे शुक्रवारी जारी केलेल्या एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार ऊस विकास आणि साखर उद्योग विभागाने हे सर्वेक्षण सुरू केले आहे. सर्व नोंदणीकृत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वेक्षणाच्या तीन दिवस आधी एसएमएस सूचना मिळतील.

### ओडिशातील शाळांना उन्हाळी सुट्टी

**भुवनेश्वर :** सध्याच्या उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी शुक्रवारी २७ एप्रिलपासून शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर केली. शालेय आणि जनशिक्षण विभागाच्या शिफारशीवरून माझी यांनी ही घोषणा केली, असे मुख्यमंत्री कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. परीक्षा, जनगणना आणि इतर शासकीय कामे नियोजित वेळेनुसार सुरू राहतील, असे त्यात म्हटले आहे.

### प्रकाश आंबेडकरांचा चौकशी आयोगाकडे अर्ज; सरकारला भूमिका मांडण्याचे निर्देश

# भीमा-कोरेगाव दंगलीस फडणवीसांना जबाबदार धरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** भीमा-कोरेगाव दंगल प्रकरणाला पुन्हा एकदा नवे वळण मिळाले असून प्रकाश आंबेडकर यांच्या वतीने चौकशी आयोगाकडे महत्त्वाचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. या अर्जामध्ये तत्कालीन सरकारप्रमुख देवेंद्र फडणवीस यांना दंगलीसाठी जबाबदार धरण्याची मागणी करण्यात आली आहे. या अर्जाची दखल घेत आयोगाने राज्य सरकारला आपले म्हणणे मांडण्याचे निर्देश दिले आहेत.

वंचित बहुजन विकास आघाडीच्या वतीने ॲड. किरण कदम यांनी हा अर्ज सादर केला. या अर्जात शरद पवार यांनी २०२० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिलेल्या पत्राचा आधार घेत गंभीर आरोप मांडण्यात आले आहेत.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी कोरेगाव भीमा दंगलीसंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना २०२० मध्ये पत्र दिले होते. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे आयोगाकडे दाखल करण्याची मागणी आंबेडकर यांनी केली होती.

'ही दंगल म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा कट होता. कोरेगाव भीमा दंगलीवेळी फडणवीस सरकारने सत्तेचा गैरवापर केला. सरकारने दंगलीच्या सूत्रधारांना पाठीशी घातले आणि राज्यातील जनतेची फसवणूक केली. दंगलीचे पुरावे पोलिसांनी मोडूनतोडून सादर केले. सरकारने पोलिसांच्या मदतीने कट रचला,' असा आरोप करून कोरेगाव भीमा दंगलीची विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्याची मागणी शरद पवार यांनी पत्रात केली होती.

अर्जात नमूद केल्याप्रमाणे, दंगल घडत असताना सत्तेचा गैरवापर झाला, दंगलीमागील सूत्रधारांना संरक्षण देण्यात आले आणि तपास प्रक्रियेत पोलिसांकडून पुरावे विकृत करून सादर करण्यात आले, असे आरोप करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर या प्रकरणाची स्वतंत्र विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी व्हावी, अशीही मागणी पुन्हा एकदा पुढे करण्यात आली आहे.

चौकशी आयोगाने यापूर्वी शरद पवार यांना संबंधित पत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र ते पत्र उपलब्ध नसल्याचे त्यांच्या वकिलांनी आयोगाला कळविले. याच संदर्भात उद्धव ठाकरे यांनाही नोटीस बजावण्यात आली होती. त्यांच्या वतीने हे पत्र मुख्यमंत्री कार्यालयाकडे असावे, असे सांगण्यात आले. मात्र, मुख्यमंत्री कार्यालयानेही अद्याप हे पत्र सादर केले नसल्याची माहिती अर्जदारांच्या वकिलांनी दिली. कायद्यानुसार, एखादा पक्ष आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात अपयशी ठरल्यास न्यायालय किंवा आयोग त्या पक्षाविरोधात 'विपरीत निष्कर्ष' काढू शकतो. या तरतुदीचा आधार घेत आयोगाने संबंधित पक्षांविरोधात असा निष्कर्ष काढावा, अशी मागणीही अर्जात करण्यात आली आहे. भीमा-कोरेगाव दंगल प्रकरण आधीपासूनच राज्याच्या राजकारणात संवेदनशील मुद्दा राहिला आहे. आता या नव्या अर्जामुळे या प्रकरणातील चौकशी आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा वेग मिळण्याची शक्यता आहे.

## पंकजा मुंडेंना मुख्यमंत्री करा...!

### संजय राऊतांचे वादग्रस्त व्यक्तव्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** नारीशक्ती वंदन विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण पुन्हा तापले असून, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्याने नव्या चर्चांना तोंड फुटले आहे. "महिलांबद्दल खरंच आस्था असेल, तर पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री करा," असे आव्हान त्यांनी भाजपला दिले.

माध्यमांशी बोलताना राऊत यांनी नारीशक्ती वंदन विधेयकावर तीव्र टीका केली. "हे केवळ दिखावा आहे. महिलांना खऱ्या अर्थाने सत्तेत स्थान द्यायचे असेल, तर मुख्यमंत्री आणि पंतप्रधान पदांवर महिलांना संधी दिली पाहिजे," असे ते म्हणाले. केंद्रातील सरकारवर निशाणा साधत त्यांनी देशाच्या स्थितीबाबतही चिंता व्यक्त केली.

दरम्यान, भाजपकडून या विधेयकाच्या समर्थनार्थ मुंबई आणि पुण्यात जनआक्रोश मोर्चे काढण्यात आले होते. या मोर्चांवर प्रतिक्रिया देताना राऊत यांनी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि महिलांच्या सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर सरकारची भूमिका ढोंगी असल्याचा आरोप केला. याचवेळी त्यांनी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही भाष्य केले. "महाविकास आघाडीच्या आमदारांना दिलासा देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेत जाणे आवश्यक आहे," असे ते म्हणाले. तसेच सुप्रिया सुळे यांनीही ठाकरे यांनी आघाडीचे नेतृत्व करावे, अशी भूमिका मांडल्याचे त्यांनी सांगितले. राऊत यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा आहे.

## 'आप'मध्ये मोठी फूट पडणार?

### ५० आमदार फुटण्याचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राज्यसभेतील काही खासदारांनंतर आता आम आदमी पक्ष मध्ये मोठी फूट पडण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, तब्बल ५० आमदार भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या दाव्यामुळे पंजाबच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

हा दावा काँग्रेसचे नेते अमरिंदर सिंग राजा वारिंग यांनी केला आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी म्हटले की, "आता खासदार फुटले आहेत; पुढील टप्प्यात ५० आमदारही भारतीय जनता पक्ष मध्ये प्रवेश करू शकतात. पक्षाने याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे." २०२२ मधील पंजाब विधानसभा निवडणुकीत 'आप'ने ११७ पैकी ९२ जागा जिंकत स्पष्ट बहुमतासह सत्ता मिळवली होती. मात्र २०२७ च्या निवडणुकांपूर्वीच पक्षात अस्थिरतेचे संकेत मिळत असल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, 'आप'चे वरिष्ठ नेते संजय सिंह यांनी भाजपवर "ऑपरेशन लोटस" राबवण्याचा आरोप केला आहे. "देशभरात आमचे आमदार आणि खासदार फोडण्याचा प्रयत्न सुरू आहे," असे त्यांनी म्हटले. या घडामोडींमुळे पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यासमोर मोठे राजकीय आव्हान उभे राहिले आहे. दरम्यान, या दाव्यांमुळे पंजाबमधील 'आप' सरकारच्या स्थिरतेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील काही दिवसांत चित्र स्पष्ट होईल.

(संबंधित वृत्त पान ४)

### सुनेत्रा, पार्थ आणि जय पवार वेगवेगळ्या पातळ्यांवर नेतृत्व करणार

# पवार कुटुंबात जबाबदाऱ्यांचे वाटप निश्चित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या नेतृत्वाची मांडणी सुरू झाली असून, पवार कुटुंबात जबाबदाऱ्यांचे स्पष्ट वाटप करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांच्या खांद्यावर वेगवेगळ्या पातळ्यांवर जबाबदाऱ्या सोपवण्यात येत असल्याने पक्षातील सत्तासंतुलनात बदल होण्याची चर्चा रंगली आहे.

२८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर पक्षाची धुरा सुनेत्रा पवार यांच्या हाती आली. अल्पावधीतच त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत पक्षाध्यक्षपदाची जबाबदारीही स्वीकारली. राज्यभर संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर देत अजित पवारांचे अपूर्ण राहिलेले राजकीय ध्येय पूर्ण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

सुनेत्रा पवार या आता राज्यभर दौरे करून पक्ष विस्तार आणि जनसंपर्कावर लक्ष केंद्रित करणार आहेत. त्यामुळे बारामती आणि पुणे ग्रामीण भागातील स्थानिक राजकारणाची जबाबदारी जय पवार यांच्याकडे देण्यात आली आहे. जय पवार दर मंगळवारी बारामतीत जनता दरबार घेऊन नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले जात आहे. बारामती पोटनिवडणुकीदरम्यान त्यांनी सक्रिय भूमिका बजावत संघटन मजबूत करण्याचे काम केले होते.

दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडे मुंबई आणि दिल्ली पातळीवरील राजकारणाची धुरा सोपवण्यात आली आहे. राज्यसभा सदस्य म्हणून त्यांची निवड झाल्यानंतर त्यांना राष्ट्रीय स्तरावर पक्षाचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. आक्रमक शैली आणि तातडीने निर्णय घेण्याची भूमिका यामुळे पार्थ पवार पक्षातील तरुण नेतृत्वाचा चेहरा म्हणून पुढे येत आहेत. या नव्या मांडणीत पवार कुटुंबाचा पक्षावरील प्रभाव अधिक मजबूत होत असल्याचे दिसत असून, यामुळे पक्षातील ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या भूमिकेबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

### आरबीआयचा निर्णय; नियमांचे उल्लंघन, ठेवीदारांच्या सुरक्षेचा प्रश्न

# पेटीएम पेमेंट्स बँकेचा परवाना अखेर रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) ने शुक्रवारी मोठा निर्णय घेत पेटीएम पेमेंट्स बँक चा बँकिंग परवाना रद्द केल्याची घोषणा केली आहे. बँकेने नियामकांनी घालून दिलेल्या नियमांचे सातत्याने उल्लंघन केल्यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आल्याचे आरबीआयने स्पष्ट केले.

आरबीआयच्या निवेदनानुसार, पेमेंट्स बँक म्हणून कार्यरत असताना पेटीएम पेमेंट्स बँकेने परवान्याच्या अटींचे पालन करण्यात वारंवार अपयश दाखवले. नियामकांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना आणि निर्देशांकडे दुर्लक्ष करण्यात आले, ज्यामुळे ठेवीदारांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले. अशा परिस्थितीत बँकेला कामकाज सुरू ठेवण्यास परवानगी देणे सार्वजनिक हिताच्या विरोधात ठरेल, असे आरबीआयने नमूद केले. या निर्णयानंतर संबंधित बँकेला ठेवी स्वीकारणे, पैसे हस्तांतरण सेवा देणे किंवा इतर बँकिंग व्यवहार सुरू ठेवता येणार नाहीत. तसेच, बँकेचे कामकाज पूर्णपणे बंद करण्यासाठी (वाइंडिंग अप) उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला जाणार असल्याची माहितीही आरबीआयने दिली आहे. वित्तीय प्रणालीतील शिस्त राखणे आणि ग्राहकांचे हित जपणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या घडामोडींचा परिणाम लाखो ग्राहकांवर तसेच देशातील फिनटेक क्षेत्रावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पेटीएम पेमेंट्स बँक ही डिजिटल पेमेंट क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था असल्याने या निर्णयाकडे संपूर्ण उद्योगाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, वन ९७ कम्युनिकेशन्स या पेटीएमच्या मूळ कंपनीच्या शेअर्सवरही या निर्णयाचा परिणाम दिसून आला. शुक्रवारी शेअरमध्ये घसरण नोंदवली गेली असून गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थता वाढल्याचे दिसून आले. हा शेअर सुमारे ०.५६ टक्क्यांनी घसरून १,१५३ रुपयांवर बंद झाला. दिवसभरात या शेअरने १,१७० रुपयांचा उच्चांक आणि १,१४२.५० रुपयांचा नीचांक गाठला, तर ओपनिंग १,१५९.९५ रुपयांवर झाली होती. इंट्राडे व्यवहारादरम्यान शेअरवर दबाव कायम राहिला आणि दुपारच्या सुमारास तो १,१४६ रुपयांच्या आसपास घसरला.

### लाच घेताना उपायुक्त अडकला

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेतील अतिक्रमण विभागाचे उपायुक्त कैलास गायकवाड यांना ४२ हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली आहे.या कारवाईनंतर मनपातील इतर अधिकाऱ्यांवरही संशयाची सुई फिरली आहे. जवळपास १५ वरिष्ठ अधिकारी आता चौकशीच्या रडारवर आले आहेत. एसीबीकडून करण्यात आलेल्या या कारवाईनंतर अतिक्रमण विभागातील उपायुक्त,सहाय्यक आयुक्त, अभियंता तसेच कनिष्ठ अभियंता अशा १५ अधिकाऱ्यांना चौकशीसाठी वाशी येथील एसीबी कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## ओबीसी अत्याचार रोखण्यासाठी समिती

### १० दिवसांत तक्रारींवर कारवाई बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात अलीकडच्या काळात ग्रामीण आणि निमशहरी भागांत ओबीसी समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांच्या घटनांमुळे निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ओबीसी समाजाच्या संरक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ओबीसी समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर तातडीने उपाययोजना करणे, तसेच अत्याचाराच्या घटनांना आळा घालणे, हे या समितीचे प्रमुख उद्दिष्ट असणार आहे. राज्यस्तरासोबतच जिल्हा आणि उपविभागीय स्तरावरही स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात आल्या असून, स्थानिक पातळीवर जलद प्रतिसाद मिळावा यासाठी ही रचना करण्यात आली आहे. अत्याचाराच्या घटनांमध्ये पीडितांना अनेकदा पोलीस ठाण्याच्या फेऱ्या माराव्या लागतात, ही बाब लक्षात घेऊन सरकारने कठोर निर्देश जारी केले आहेत. ओबीसी समाजातील कोणत्याही व्यक्तीवर अत्याचार झाल्यास तात्काळ एफआयआर नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे तक्रार नोंदविण्यात होणारा विलंब आणि प्रशासकीय अडथळे कमी होण्याची अपेक्षा आहे.

ओबीसी व्यक्तीने तक्रार दाखल केल्यानंतर संबंधित समितीने १० दिवसांच्या आत त्याची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे बंधनकारक असणार आहे. या तरतुदीमुळे तक्रारींच्या निपटाऱ्यात गती येणार असून, पीडितांना वेळेत न्याय मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### दहशतवादी गटाचा तळ उद्ध्वस्त केल्याचा दावा

# इराणचा 'मध्यस्थ' पाकिस्तानच्या सीमेजवळ हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान/इस्लामाबाद :** इराण आणि अमेरिकेमधील तणाव निवळवण्यासाठी मध्यस्थी करत असलेल्या पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे. इराणने पाकिस्तानी सीमेजवळ कारवाई करत जैश-अल-अदल या दहशतवादी संघटनेचा तळ उद्ध्वस्त केल्याचा दावा केला आहे. या कारवाईमुळे प्रादेशिक तणाव पुन्हा वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

इराणच्या तास्निम वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सिस्तान आणि बलुचिस्तान प्रांतातील रास्क परिसरात पाकिस्तानी सीमेकडून घुसखोरी झाल्याचे उघड झाल्यानंतर इराणी सुरक्षा दलांनी तात्काळ प्रत्युत्तरात्मक कारवाई केली. या कारवाईत जैश-अल-अदल या दहशतवादी गटाचा एक सक्रिय गट उद्ध्वस्त करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या हल्ल्यात अनेक दहशतवादी ठार झाल्याची माहितीही समोर आली आहे.

जैश-अल-अदल हा सुन्नी दहशतवादी गट २०१२ मध्ये स्थापन झाला असून, इराण-पाकिस्तान सीमाभागात तो दीर्घकाळापासून सक्रिय आहे. इराणी सुरक्षा दलांवर हल्ले, घुसखोरी आणि अस्थिरता निर्माण करण्याच्या कारवायांमध्ये या संघटनेचा सहभाग असल्याचा आरोप इराणकडून वारंवार करण्यात आला आहे. अनेक हल्ल्यांची जबाबदारी या गटाने स्वीकारल्याचेही नोंदवले गेले आहे. या प्रकरणात इराणने पाकिस्तानवर अप्रत्यक्षपणे दबाव आणत या दहशतवादी गटाला आश्रय मिळत असल्याचा आरोप केला आहे. मात्र पाकिस्तानने हे आरोप फेटाळून लावत अशा कोणत्याही कारवायांना पाठिंबा नसल्याचे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या गटावर २०१६ मध्ये भारतीय नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांच्या अपहरणात सहभाग असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. इराणी अधिकाऱ्यांच्या मते, या घटनेनंतर जाधव यांना पाकिस्तानच्या ताब्यात देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या शांतता चर्चांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पाकिस्तानने मध्यस्थी करत इस्लामाबादमध्ये पहिल्या फेरीच्या चर्चेचे आयोजन केले होते. मात्र त्यातून ठोस तोडगा निघाला नव्हता. दुसऱ्या फेरीसाठी अपेक्षा व्यक्त होत असतानाच इराणने पाकिस्तानला शिष्टमंडळ पाठवण्यास नकार दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या चर्चांवर अनिश्चिततेचे सावट गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकी अध्यक्ष ट्रम्प यांनी तीन आठवड्यांसाठी युद्धविराम जाहीर केल्यामुळे जगाला दिलासा मिळाला आहे.

## विधान परिषदेसाठी जगदिश मुळीक यांच्या नावाची चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत भाजपच्या संभाव्य उमेदवारांची यादी निश्चित करण्यात आली आहे. पक्षाच्या वाट्याला येणाऱ्या सहा जागांसाठी तब्बल तीस इच्छुकांची यादी अंतिम करून ती केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवण्यात आली असून, उमेदवारांची अंतिम घोषणा दिल्लीहून होणार आहे.

या यादीत काही प्रबळ आणि चर्चेतील नावांसोबतच पुण्यातील भाजपचे नेते जगदीश मुळीक यांचे नाव विशेष चर्चेत आले आहे. मुळीक हे फडणवीसांचे निकटवर्तीय मानले जातात आणि त्यांना यावेळी संधी मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. मुळीक यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत वडगाव शेरी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तयारी केली होती. मात्र महायुतीतील जागावाटपाच्या पार्श्वभूमीवर हा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेल्याने आणि विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांना संधी देण्यात आल्याने भाजपला माघार घ्यावी लागली होती. त्या वेळी फडणवीसांनी स्वतः हस्तक्षेप करून मुळीक यांची समजूत काढल्याची माहिती समोर आली होती. त्या बदल्यात योग्यवेळी न्याय दिला जाईल, असा शब्द मुळीक यांना देण्यात आल्याची चर्चा होती. आता विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने तो 'योग्य वेळ' आल्याची चर्चा पुणे आणि राज्याच्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## संपादकीय

# बंगाली मतपेटीचा 'विद्रूप' टक्का



**पश्चिम बंगालच्या भूमीवर लोकशाहीचा उत्सव नेहमीच रक्ताच्या डागांनी माखलेला असतो, पण यंदाच्या विक्रमी मतदानाने प्रस्थापित समीकरणांनाच सुरुंग लावला आहे. ९१ लाख मतदारांच्या 'एसआयआर'मधील गोंधळ आणि हिंसेच्या सावलीत उमटलेला हा कौल नक्की कोणाला 'परिवर्तना'ची वाट दाखवणार, की केवळ दहशतीचे नवे पर्व सुरू करणार?**

पश्चिम बंगालच्या राजकारणाचा पोत हा नेहमीच इतर राज्यांच्या तुलनेत काहीसा जहाल आणि तितकाच गुंतागुंतीचा राहिला आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील विक्रमी मतदानाचा टक्का हा केवळ लोकशाहीवरील विश्वासाचे प्रतीक आहे की सत्तेविरुद्ध साचलेल्या संतापाचा स्फोट, याचे विश्लेषण करणे आज अनिवार्य ठरते. बंगालमधील मतदान हे आता केवळ 'लोकशाही प्रक्रिया' राहिलेली नसून, तो एक 'अस्तित्वाचा लढा' बनला आहे, जिथे मतपेटीतून उमटणारा प्रत्येक टक्का हा कोणाच्या तरी सत्तेचा अंत किंवा कोणाच्या तरी दहशतीचा उदय ठरत असतो. तब्बल ९१ लाख मतदारांची नावे यादीतून वगळली जाणे, हा एका पद्धतशीर 'राजकीय इंजिनीअरिंग'चा भाग असल्याचे स्पष्ट होते. जेव्हा लाखो नागरिकांचे नाव एका झटक्यात यादीतून गायब होते, तेव्हा त्यामागे केवळ तांत्रिक त्रुटी नसून, मतदारांच्या एका मोठ्या वर्गाला लोकशाही प्रक्रियेतून बेदखल करण्याचा डाव असतो. विरोधकांनी या मुद्द्याचे ज्या प्रकारे 'भावनिक भांडवल' केले, त्याने मतदानाचा टक्का वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ममता बॅनर्जी यांची 'लढाऊ वृत्ती' ही त्यांची सर्वात मोठी जमेची बाजू असली, तरी गेल्या १५ वर्षांच्या सत्तेनंतर निर्माण झालेली 'अँटी-इन्कम्बन्सी' (सत्ताविरोधी लाट) आता उघडपणे दिसू लागली आहे. बंगालमधील हिंसाचार हा आता केवळ निवडणुकांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो तिथल्या राजकीय संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला आहे. 'कट मनी' संस्कृती, स्थानिक नेत्यांची मुजोरी आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे तरुणांमध्ये जो असंतोष निर्माण झाला आहे, तो या विक्रमी मतदानातून बाहेर आला असावा, असा तर्क लावण्यास वाव आहे. तृणमूलच्या 'कॅडर' आधारित राजकारणाने जरी जमिनीवर पकड मजबूत ठेवली असली, तरी जेव्हा सामान्य माणूस दहशतीच्या भिंती ओलांडून मतदानासाठी बाहेर पडतो, तेव्हा मोठे गड कोसळायला वेळ लागत नाही. भारतीय जनता पक्षाने बंगालमध्ये लावलेली 'फिल्डिंग' ही केवळ निवडणुका जिंकण्यासाठी नाही, तर तिथल्या संपूर्ण राजकीय संस्कृतीचा 'डीएनए' बदलण्यासाठी आहे. 'सोनार बांगला'च्या घोषणा आणि धार्मिक ध्रुवीकरणाचा कार्ड वापरून भाजपने तृणमूलच्या बालेकिल्ल्यात भगवे खिंडार पाडण्याचा जो प्रयत्न केला, त्याला या विक्रमी मतदानाने बळ दिले आहे. मात्र, येथे प्रश्न असा पडतो की, बंगालची जनता केवळ 'पर्याय' शोधत आहे की खरोखरच एका नव्या विचारसरणीला स्वीकारत आहे? 'एसआयआर'चा घोळ निस्तारण्यात आलेले अपयश आणि हिंसेच्या घटनांना रोखण्यात आलेली हतबलता, यामुळे घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. लोकशाहीत 'मतदान' हा पवित्र अधिकार मानला जातो, पण जेव्हा त्या हक्कावरच गदा येते किंवा तो हक्क बजावताना जिवाची भीती वाटते, तेव्हा त्या विक्रमी टक्क्याचे कौतुक करावे की त्यातील 'विद्रूपता' तपासावी, हा पेच निर्माण होतो. ९१ लाख मतदारांच्या नावाचा प्रश्न हा केवळ मतदानापुरता मर्यादित नसून, तो या नागरिकांच्या हक्काचा आणि अस्मितेचा प्रश्न आहे. जर यातील मोठा भाग हा स्थलांतरित असेल, तर त्यांच्या अनुपस्थितीत झालेले मतदान हे 'फेअर प्ले' च्या व्याख्येत बसते का? विक्रमी मतदान हे प्रस्थापित सत्तेसाठी धोक्याची घंटा असू शकते, पण येणारी नवी सत्ता ही लोकशाही मूल्यांची जपणूक करेल का, याची शाश्वती कोणालाच नाही. बंगालला आज गरज आहे ती एका अशा नेतृत्वाची, जे हिंसेचा त्याग करून राज्याला पुन्हा एकदा 'वैचारिक प्रबोधना'च्या वाटेवर नेईल. अन्यथा, हा विक्रमी टक्का केवळ एका हुकूमशाहीतून दुसऱ्या हुकूमशाहीकडे जाण्याचा मार्ग ठरेल. मतदानाचा हा डोंगर सत्तेचा डोलारा उभा करेल की तो मातीमोल करेल, हे लवकरच स्पष्ट होईल. पण एक गोष्ट निश्चित, बंगालचा हा निकाल केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसेल, तर तो देशाच्या भविष्यातील 'निवडणूक रणनीती'चा एक नवा अध्याय लिहिला जाईल. ९१ लाखांचा तो 'अदृश्य' मतदार आणि रांगांमधला हा 'आक्रमक' टक्का, यांच्या संघर्षात लोकशाहीचा विजय होतो की सत्तेचा उन्माद, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# कयामतच्या सावल्या आणि मुत्सद्देगिरीचा अस्त




पश्चिम आशियापासून युरोपच्या मैदानांपर्यंत सध्या जे काही सुरू आहे, ते केवळ दोन देशांमधील सीमावाद किंवा वर्चस्ववाद नाही, तर तो प्रस्थापित जागतिक व्यवस्थेचा अंत आहे. जगाने दुसऱ्या महायुद्धानंतर शांततेचा जो काही 'भ्रम' जोपासला होता, त्या भ्रमाचे इमले आता एकामागून एक कोसळू लागले आहेत. सध्याची परिस्थिती ही 'कोल्ड वॉर' (शीतयुद्ध) पेक्षाही अधिक भीषण आहे, कारण आता समोरचा शत्रू कोण आणि तो कधी कोणता बटन दाबेल, याचा भरवसा कोणालाच राहिलेला नाही.

युक्रेनमध्ये रशियाने सुरू केलेले युद्ध आता तिसऱ्या वर्षात पदार्पण करत असताना, तिथे शांततेची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. उलट, नाटो आणि रशिया यांच्यातील ताणलेला दोर कोणत्याही क्षणी तुटण्याच्या स्थितीत आहे. रशियासाठी हे युद्ध आता केवळ भूभाग जिंकण्याचे साधन उरलेले नाही, तर ते त्यांच्या 'अस्तित्वाचे' प्रतीक बनले आहे. दुसरीकडे, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षविरामाच्या चर्चा म्हणजे निव्वळ 'वेळ मारून नेण्याचे' प्रकार वाटू लागले आहेत. होर्मुझची समुद्रधुनी असो वा तांबडा समुद्र; व्यापाराच्या वाटा आता लष्करी ताफ्यांच्या सावलीत दडल्या आहेत. जेव्हा व्यापार हा युद्धाच्या दावणीला बांधला जातो, तेव्हा जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडणे ही केवळ काळाची बाब उरते.

या सर्व प्रक्रियेत सर्वात मोठा पराभव झाला आहे तो 'आंतरराष्ट्रीय संस्थांचा'. संयुक्त राष्ट्रे ही संघटना आता केवळ 'निषेध नोंदवणारे कार्यालय' बनली आहे की काय, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. ज्या संस्थांनी जगाला युद्धापासून वाचवणे अपेक्षित होते, त्या संस्था आज महासत्तांच्या दावणीला बांधल्या गेल्या आहेत.

जेव्हा 'पॉवर पॉलिटिक्स' हे 'प्रिन्सिपल पॉलिटिक्स'वर (तत्त्वांच्या राजकारणावर) वरचढ ठरते, तेव्हा शांततेचे नोबेल मिळवणे सोपे असते, पण शांतता प्रस्थापित करणे कठीण. जागतिक नेत्यांमधील 'इगो' (अहंकार) हा आज मानवतेच्या भविष्यापेक्षा मोठा झाला आहे, हे या युगाचे सर्वात मोठे दुर्दैव आहे.

आर्थिक आघाडीवर तर परिस्थिती अधिकच 'ब्लॅक' (काळी) आहे. युद्धाच्या भीतीमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी अस्थिरता, विस्कळीत झालेली पुरवठा साखळी आणि महागाईचा भस्मासुर यांनी सर्वसामान्यांचे जगणे कठीण केले आहे. संरक्षण बजेटमध्ये होणारी वाढ ही शिक्षण आणि आरोग्यावरील कपातीच्या किमतीवर होत आहे. जगाने आज अन्नापेक्षा शस्त्रास्त्रांना प्राधान्य दिले आहे. जेव्हा तोफांचे उत्पादन हे गव्हाच्या उत्पादनापेक्षा महत्त्वाचे ठरू लागते, तेव्हा समजावे की संस्कृती विनाशाच्या मार्गावर आहे.

भारतासारख्या देशासाठी हे वारे अधिक चिंताजनक आहेत. आपण 'विश्वमित्र' होण्याचे स्वप्न पाहत असताना, जगातील दोन मोठ्या गटांमध्ये समतोल राखणे आता 'दोरीवरची कसरत' ठरत आहे. एका बाजूला रशियाशी असलेली जुनी मैत्री आणि दुसऱ्या बाजूला अमेरिकेशी असलेली धोरणात्मक भागीदारी; या दोन्ही आघाड्यांवर आपल्याला आपल्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करायचे आहे. पण जेव्हा जग 'ध्रुवीकृत' होते, तेव्हा तटस्थतेला स्थान उरत नाही. आपण कितीही म्हटले की 'हे युद्धाचे युग नाही', तरीही जगाने युद्धालाच आपले नवे 'नॉर्मल' मानले आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही.

> » जागतिक क्षितिजावर साचलेले युद्धाचे ढग आता केवळ पावसाची नव्हे, तर विनाशाची पूर्वसूचना देत आहेत. मुत्सद्देगिरीच्या गप्पा जेव्हा तोफांच्या गर्जनेत विरून जातात, तेव्हा जागतिक शांततेचा भविष्यकाळ भयावह वाटू लागतो.

या 'धूसर' दृष्टिकोनामागे केवळ राजकीय कारणे नाहीत, तर तंत्रज्ञानाचा विध्वंसक वापरही आहे. सायबर वॉरफेअर, अण्वस्त्रांची धमकी आणि अवकाशातील स्पर्धा यामुळे युद्धाची व्याप्ती आता जमिनीवरून थेट आभाळात पोहोचली आहे. जेव्हा एखादा हुकूमशाह किंवा लोकशाहीच्या मुखवट्याआडचा सर्वेसर्वा स्वतःला कायद्याच्या वर समजू लागतो, तेव्हा जागतिक शांतता ही एका 'उन्मादाच्या' टोकावर उभी असते.

युद्धाचे हे ढग सहजासहजी विरणार नाहीत. कारण युद्धाचा हा व्यापार अनेकांसाठी फायद्याचा ठरत आहे. शस्त्रास्त्र कंपन्यांचे खिसे भरत असताना सामान्य माणसाचे रक्त सांडणे, हे जागतिक राजकारणाचे जुनेच गणित आहे. जर जगाला या विनाशापासून वाचायचे असेल, तर मुत्सद्देगिरीला केवळ कागदावर नाही, तर कृतीत उतरावे लागेल. अन्यथा, येणारा काळ हा केवळ इतिहासातील 'काळा कालखंड' म्हणून नाही, तर मानवी विवेकाचा 'अंत' म्हणून नोंदवला जाईल. कयामतच्या या सावल्यांपासून वाचण्यासाठी आता केवळ 'प्रार्थना' पुरेशी नाही, तर ठोस 'प्रतिकाराची' गरज आहे.

# मालमत्ता कर बिलांचे घरपोच वाटप सुरू

## बचत गटांच्या माध्यमातून पालिकेची मोहीम

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर बिलांचे घरपोच वाटप सुरू करण्यात आले आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

शहरातील सुमारे ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मिळकतींसाठी कर बिलांचे वितरण करण्यात येणार आहे. मालमत्ता सर्वेक्षणातून नव्याने सापडलेल्या मिळकतींची नोंदणी सुरू असून, एकूण संख्या ८ लाखांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या सर्व मिळकतींचे बिल घरपोच पोहोचविण्याची जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला बचत गटांकडे सोपविण्यात आली आहे. महापालिकेने यापूर्वीही या पद्धतीने बिल वितरण केले असून, गेल्या काही वर्षांत महिलांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली आहे. यंदाही सर्व देयकांचे वितरण निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. थकबाकीदारांना देयकासोबत जप्तीपूर्वीची नोटीस देण्यात येणार असून, नागरिकांना थकीत कर भरण्याची संधी मिळणार आहे. तसेच महिला बचत गटांकडून घरोघरी जाऊन मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, करासंदर्भातील माहिती देणे आणि प्रक्रियेबाबत मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. या मोहिमेत 'सक्षम' प्रकल्पांतर्गत महिला बचत गट फेडरेशनच्या ६०० हून अधिक महिला सहभागी झाल्या आहेत. 'सिद्धी' ॲपच्या माध्यमातून बिल वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक व वेगवान करण्यात आली आहे. नागरिकांनी महिला बचत गटांना सहकार्य करून वेळेत मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या उपक्रमातून नागरिकांना सुलभ सेवा मिळण्यासोबतच महिला सक्षमीकरणालाही चालना मिळत असल्याचे सांगितले. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी ही प्रक्रिया अधिक पारदर्शक व तंत्रज्ञानाधिष्ठित असल्याचे नमूद केले, तर उपायुक्त सचिन पवार यांनी शंभर टक्के बिल वितरणाचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे सांगितले.

# विनापरवाना जाहिरात फलकांवर कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून शहरातील विनापरवाना जाहिरात फलकांविरोधात कारवाई सुरू असून, विविध भागांतील तीन फलक हटवण्यात आले.

महापालिकेच्या कार्यक्षेत्रात जाहिरात फलक उभारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४४ व २४५ तसेच ९ मे २०२२ च्या नियमांनुसार पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र, या नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेले फलक हटवण्याची मोहीम महापालिकेकडून राबविण्यात येत आहे. या अंतर्गत कातळेवस्ती (किवळे) येथील एन.डी.एस. बँक्वेट्स लॉनसमोर उभारलेले २० बाय २० आकाराचे दोन फलक तसेच चिंचवड येथील मोरया गोसावी मंदिरासमोरचा १० बाय १० आकाराचा एक फलक निष्कासित करण्यात आला. महापालिकेच्या हद्दीतील जाहिरात एजन्सी व व्यावसायिकांनी विनापरवाना फलक उभारू नयेत, अन्यथा त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा आकाशचिन्ह व परवाना विभागाने दिला आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहर नियोजनासाठी नियमांचे पालन आवश्यक असल्याचे सांगितले, तर उपायुक्त राजेश आगळे यांनी अनधिकृत फलकांविरोधात कारवाई सुरूच राहील, असे स्पष्ट केले.

# पीसीएमसी मेट्रोसाठी फिडर बससेवा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) वतीने पीसीएमसी मेट्रो स्थानक ते काळेवाडी फाटा दरम्यान मेट्रो फिडर बससेवा सुरू करण्यात आली असून, या सेवेमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मेट्रो फिडर बसमार्ग क्रमांक ३१ या मार्गावर धावणार असून, काळेवाडी, रहाटणी आणि पिंपरी परिसरातील नागरिकांना थेट मेट्रो जोडणी उपलब्ध झाली आहे. या मार्गामुळे विजयनगर, तापकीरनगर, श्रीनगर, धनगरबाबावस्ती, ज्योतिबानगर यांसारख्या दाट लोकवस्तीच्या भागांनाही मेट्रोशी संपर्क साधता येणार आहे. सध्या पुणे मेट्रोच्या प्रवाशांसाठी १० मेट्रो स्थानकांवरून २३ मार्गांवर एकूण ८३ फिडर बससेवा उपलब्ध असून, नव्या मार्गामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. या बससेवेचा प्रवास दर १० ते २० रुपयांदरम्यान असल्याने नागरिकांना परवडणारा पर्याय उपलब्ध झाला आहे.

ही बस सेवा सकाळी ६.३० वाजल्यापासून सुरू होणार असून, गर्दीच्या वेळेत दर १५ मिनिटांनी, तर इतर वेळेत दर ३० मिनिटांनी बस उपलब्ध असेल. पहिली बस सकाळी ६.३० वाजता पीसीएमसी मेट्रो स्थानकावरून, तर सकाळी ७ वाजता काळेवाडी फाटा येथून सुटेल. शेवटची बस रात्री ९ वाजता पीसीएमसीवरून आणि रात्री ९.३० वाजता काळेवाडी फाटा येथून सुटणार आहे.

# स्वच्छतेसाठी पालिकेची जनजागृती मोहीम

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने "माझे शहर, माझी जबाबदारी" या अभियानांतर्गत स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, भोसरीतील पांडवनगर येथे नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत सामूहिक शपथ देण्यात आली.

महापालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ६ मध्ये आयोजित या कार्यक्रमात "स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६" संदर्भात नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छतेचे पालन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची कर्तव्यभावना असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.




या अभियानांतर्गत शहरातील भाजी मंडई, फेरीवाले, चौक-रस्ते, सिग्नल परिसर, बस स्थानके तसेच शाळा आणि महाविद्यालयांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी कचरा व्यवस्थापनाचे नियम पाळणे, प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करणे, ओला-सुका कचरा वेगळा देणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता टाळणे अशा बाबींवर विशेष भर देण्यात येत आहे. कार्यक्रमात उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. "मी स्वच्छाग्रही" या संकल्पनेतून नागरिकांनी स्वतःपासून सुरुवात करून परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महापालिका "स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६" मध्ये शहराला अग्रस्थानी नेण्यासाठी प्रयत्नशील असून, नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# जिवंत महिलेला कागदोपत्री मृत दाखवून जमिनीवर डल्ला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पुणे :** बाणेर परिसरात जिवंत असलेल्या महिलेचा बनावट मृत्यू दाखला तयार करून त्यांच्या मालकीची कोट्यवधींची जमीन हडपण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बाणेर पोलिसांनी तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मृणालिनी संजय निकम (वय ५२, रा. पाषाण) यांनी फिर्याद दिली असून, सविता दत्तात्रय सोमवंशी, शैलेश राठोड आणि दत्तात्रय संभाजीराव शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादींच्या वडिलांनी १९८८ मध्ये बाणेर येथे ४३० चौरस मीटरचा प्लॉट त्यांच्या आईच्या नावावर खरेदी केला होता. एप्रिल २०२६ मध्ये या जागेच्या विकासासंदर्भात हालचाली सुरू झाल्यानंतर मृणालिनी निकम यांनी सातबारा आणि इतर ऑनलाइन नोंदी तपासल्या असता, मालकी हक्कात बदल झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

तपासात आरोपींनी ई-हक्क प्रणालीमध्ये फेरफार करून फिर्यादींच्या आईचा बनावट मृत्यू दाखला तयार केल्याचे उघड झाले. प्रत्यक्षात संबंधित महिला जिवंत असताना त्यांना मृत दाखवून खोटे वारस प्रमाणपत्र तयार करण्यात आले. तसेच जमिनीचे अधिकार मिळवण्यासाठी बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करून तहसील कार्यालयात अर्ज करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

हा प्रकार फेब्रुवारी २०२४ ते एप्रिल २०२६ या कालावधीत घडल्याचे पोलिसांनी सांगितले. बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब झरे पुढील तपास करत आहेत.

### एनडीपीएस प्रकरणातील आरोपी जेरबंद

**पुणे :** वानवडी पोलिसांनी एनडीपीएस गुन्ह्यातील फरार आरोपीला अटक करत मोठी कारवाई उघडकीस आणली आहे. आरोपीच्या ताब्यातून अंमली पदार्थांसह शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून, एकूण २८ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अक्रम अजिज शेख (रा. गुलटेकडी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वानवडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एनडीपीएस गुन्ह्यातील फरार आरोपी कॅम्प परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर तपास पथकाने सापळा रचत त्याला ताब्यात घेतले. अटकेनंतर आरोपीच्या घराची झडती घेतली असता ९२० ग्रॅम अंमली पदार्थासदृश पांढरी पावडर (सुमारे २७.६० लाख रुपये किंमत), एक देशी बनावटीचे पिस्टल, दोन मॅगझिन आणि ७ जिवंत काडतुसे असा साठा आढळून आला. आरोपी मोठ्या ड्रग्ज रॅकेटशी संबंधित असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, या प्रकरणाचा तपास पुढे सुरू आहे.

### कामगाराकडून १० लाखांची चोरी

**पुणे :** शहरातील शुक्रवार पेठ परिसरात व्यावसायिकाच्या कार्यालयातील कामगारानेच कपाटातील १० लाख रुपयांची रोकड चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५७ वर्षीय व्यावसायिक हे मार्केट यार्ड परिसरातील गंगाधाम चौकात वास्तव्यास असून त्यांचे शुक्रवार पेठेतील सुभाषनगर येथे कार्यालय आहे. या ठिकाणी अखिलेश बसंतलाल वर्मा (रा. पुरोहा, प्रयागराज, उत्तर प्रदेश) हा कामगार म्हणून कार्यरत होता. १४ एप्रिल रोजी वर्मा याने कार्यालयातील कपाटात ठेवलेली १० लाख रुपयांची रोकड मालकाच्या नकळत चोरून नेली आणि तेथून फरार झाला. कपाटातील रोकड गायब झाल्याचे लक्षात येताच व्यावसायिकाने त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा मोबाईल फोन बंद असल्याने संपर्क होऊ शकला नाही.

# खासगी मैलाशुद्धीकरण केंद्रांवर पालिकेची कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने शहरातील खासगी मैलाशुद्धीकरण केंद्रांची (एसटीपी) तपासणी करत नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली असून, एकूण ७० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

१७ ते २२ एप्रिल या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत शहरातील २१ मैलाशुद्धीकरण केंद्रांची पाहणी करण्यात आली. यामध्ये ९ केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे आढळले, तर १२ केंद्रांमधून पूर्णतः किंवा अंशतः प्रक्रिया न केलेले मैलापाणी थेट बाहेर सोडण्यात येत असल्याचे उघड झाले. या प्रकाराची दखल घेत महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने संबंधितांवर कारवाई करत दंड आकारला. ही मोहीम महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. ज्या गृहनिर्माण सोसायट्यांनी अद्याप मैलाशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित केलेले नाही किंवा प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडले जात आहे, त्यांनी तात्काळ आवश्यक उपाययोजना कराव्यात. अन्यथा संबंधितांचे पाणीपुरवठा जोडणी खंडित करण्याची कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### विद्यार्थ्याचा लॅपटॉप चोरीला गेला

**लोणी काळभोर :** हवेली तालुक्यातील लोणी काळभोर येथील चिंतामणी पार्क परिसरात एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याच्या फ्लॅटमधून लॅपटॉप चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अथर्व मोहन म्हात्रे (वय २०) हा एमआयटी इन्स्टिट्यूटमध्ये बी.टेकच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असून, तो पी.जी. मधील फ्लॅटमध्ये मित्रांसोबत राहतो. २२ एप्रिल रोजी रात्री ११.४५ वाजण्याच्या सुमारास मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी तो रूममधून बाहेर पडला होता. त्यावेळी त्याने आपला लॅपटॉप बॅगेत ठेवून हॉलमधील टेबलावर ठेवला होता. २३ एप्रिल रोजी सकाळी परत आल्यानंतर हॉलमधील टेबलावर ठेवलेली लॅपटॉपची बॅग गायब असल्याचे त्याच्या लक्षात आले.

### तरुणावर कोयत्याने हल्ला; गुन्हा दाखल

**लोणी काळभोर :** लग्न समारंभासाठी आलेल्या एका तरुणाला अडवून तिघांनी कोयत्याने वार करत डोक्यावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना कदमवाकवस्ती परिसरात घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना २० एप्रिल रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कवडीपाट टोलनाका परिसरात घडली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरेश बाबुराव गायकवाड (वय १८), कुणाल राहुल चौगुले (वय १८) आणि शुभम धर्मा सोलंकी (वय अज्ञात, सर्व रा. कदमवाकवस्ती, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी आकाश सूर्यकांत पवार (वय २८, रा. वेताळबाबा वसाहत, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

**वळसे-पाटील यांची मुख्यमंत्र्यांशी बैठक; पायाभूत सुविधांवर सकारात्मक संकेत**

# आंबेगाव-शिरूर विकासकामांना गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. या बैठकीत सिंचन योजना, धरण सुरक्षा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७च्या पार्श्वभूमीवरील पायाभूत सुविधा यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. सर्व विषयांवर सकारात्मक भूमिका घेत लवकर कार्यवाहीचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे वळसे-पाटील यांनी सांगितले.




कुकडी प्रकल्पातील महत्त्वाचे डिंभे धरण गळतीच्या समस्येमुळे चर्चेत असून, धरण सुरक्षा कायदा २०२१ अंतर्गत यासाठी १७१.५९ कोटी रुपयांच्या दुरुस्ती प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिली आहे. धरणाचे आयुष्य वाढवण्यासाठी आणि भविष्यातील धोका टाळण्यासाठी या प्रस्तावाला तातडीने प्रशासकीय मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी डिंभे येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. यासाठी जलसंपदा विभागाची सुमारे ६० आर जमीन महावितरणला हस्तांतरित करण्याची प्रक्रिया गतीमान करण्याची मागणी करण्यात आली. मंचर शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून १३३.५१ कोटी रुपयांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेलाही 'नगरोत्थान महाअभियान' अंतर्गत तातडीने मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली. ही योजना पूर्ण झाल्यास भविष्यातील पाणीटंचाईवर मोठ्या प्रमाणात मात होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

धामणी परिसरातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून उभारलेल्या ९ उपसा सिंचन योजनांना अद्याप वीज जोडणी मिळालेली नसल्याने सुमारे १२०० एकर जमीन ओलिताखाली येण्यास अडथळा निर्माण झाला आहे. या योजनांना तातडीने वीजपुरवठा देण्याचे निर्देश देण्याची विनंतीही यावेळी करण्यात आली. याशिवाय कुकडी प्रकल्पांतर्गत कळमजाई, बोरघर आणि फुलवडे येथील तीन नव्या उपसा सिंचन योजनांसाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता देण्याबाबतही चर्चा झाली. या योजनांमुळे सुमारे १५८५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. "मतदारसंघातील शेतकरी, पिण्याचे पाणी आणि भीमाशंकर तीर्थक्षेत्राचा विकास हे आमचे प्राधान्य असून, सर्व विषयांवर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे," असे दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितले.

---

## बारामतीत 'पवार विरुद्ध पवार' २०२९ मधील समीकरणांची चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदानादरम्यान पवार कुटुंबातच भविष्यातील राजकारणावरून चर्चा रंगल्या. २०२९ च्या संभाव्य उमेदवारीचा मुद्दा पुढे येताच बारामतीतील राजकीय वातावरणात नव्या घडामोडींना सुरुवात झाली आहे.

अजितदादा पवार यांचे पुत्र जय पवार यांनी आगामी निवडणुकीत आपण उमेदवार असावा, अशी बारामतीकरांची इच्छा असल्याचे वक्तव्य केल्यानंतर या चर्चेला तोंड फुटले. त्यांच्या या वक्तव्यानंतर आमदार रोहित पवार यांनी पुढील निवडणुकीत 'पवार विरुद्ध पवार' अशी थेट लढत होण्याची शक्यता व्यक्त केली. "राजकारणात परिस्थिती कधीही बदलू शकते. पक्ष वेगळे असल्याने भविष्यात जय विरुद्ध युगेंद्र अशी निवडणूक होऊ शकते," असे ते म्हणाले. मात्र, या विधानांवर कुटुंबातील इतर सदस्यांनी संयमित प्रतिक्रिया दिली. खासदार सुप्रिया सुळे यांनी या चर्चेबाबत आपल्याला कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले. तर अजितदादा पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी मतदानाच्या दिवशी अशा प्रकारची चर्चा करणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले. "आजचा दिवस महत्त्वाचा आहे. आपण सर्वजण एकत्र येऊन दादांसाठी काम करत आहोत. अशा वेळी ही चर्चा आवश्यक नव्हती," असे त्यांनी नमूद केले. युगेंद्र पवार यांनीही रोहित पवार यांचे वक्तव्य हे वैयक्तिक मत असू शकते, असे सांगत सध्याच्या घडीला अशा चर्चांना अर्थ नसल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, एकत्रितपणे काम करण्याचा संदेश दिला जात असतानाच राजकीय समीकरणांवरून उघड झालेली ही मतभिन्नता आगामी काळात मोठे वळण देऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

---

## आंबेगाव पूर्वेला उन्हाळी बाजरी फुलोऱ्यात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील विविध गावांमध्ये उन्हाळी बाजरीचे पीक सध्या फुलोऱ्यात आले असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. निरगुडसर, मेंगडेवाडी, जारकरवाडी, पोंदेवाडी, वाळूंजनगर, लाखणगाव, देवगाव, खडकवाडी, काठापूर आदी भागांत बाजरीची शेती मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे.

चालू वर्षी चांगला पाऊस झाल्याने डिंभे धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. या धरणातून उजवा व डावा कालवा तसेच घोड नदीमार्फत शाश्वत पाणीपुरवठा होत असल्याने कालवा व नदीकाठच्या गावांमध्ये उन्हाळी बाजरीचे क्षेत्र वाढले आहे.

उन्हाळ्यातील स्वच्छ व दमदार हवामानामुळे बाजरीचे पीक जोमाने वाढत असून सध्या फुलोऱ्यात आले आहे. पाण्याची उपलब्धता मुबलक असल्याने कणसांचे आकार मोठे झाले असून दाणेही टपोरे दिसत आहेत. त्यामुळे यंदा उत्पादनात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

उन्हाळी बाजरीच्या पिकासाठी पेरणीनंतर खुरपणी, खत व्यवस्थापन आणि पक्ष्यांपासून संरक्षण यासाठी विशेष काळजी घ्यावी लागत असल्याचेही शेतकऱ्यांनी सांगितले. चांगल्या उत्पादनाच्या अपेक्षेने या भागातील अनेक शेतकरी दरवर्षी उन्हाळी बाजरीची लागवड करत आहेत.

---

## आरटीई प्रवेश प्रक्रियेत गैरव्यवहारांचा आरोप

**बोगस कागदपत्रांद्वारे अपात्रांना प्रवेश; गरजू विद्यार्थ्यांचा हक्क धोक्यात**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शिक्षणाचा हक्क देणाऱ्या आरटीई योजनेच्या प्रवेश प्रक्रियेत पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के जागांवर अपात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळवल्याची चर्चा असून, या प्रकरणामुळे शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पूर्व हवेली तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील विविध भागांत आरटीई प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. बोगस उत्पन्न दाखले, बनावट राहत्या पत्त्यांची कागदपत्रे, खोटे भाडेकरार तसेच इतर फसवे दस्तऐवज तयार करून आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांनी आपल्या मुलांचे प्रवेश निश्चित



केल्याचे उघड होत आहे. विशेष म्हणजे, या प्रवेशांसाठी ५ हजार ते २५ हजार रुपयांपर्यंत 'देणघेण' झाल्याचेही बोलले जात आहे.

या संपूर्ण प्रकरणात शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. अर्जांची पडताळणी करताना जाणीवपूर्वक शिथिलता ठेवण्यात आली, नियमांकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि आर्थिक फायद्यासाठी अपात्र अर्जांना मंजुरी देण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे आरटीईसारख्या संवेदनशील आणि महत्त्वाच्या योजनेलाच काळिमा फासला गेला आहे.

गैरव्यवहारांचा आवाका केवळ काही शाळांपुरता मर्यादित नसून संपूर्ण पुणे जिल्ह्यात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी स्थानिक गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला, तर आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील मुलांनी त्या जागांवर कब्जा केल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे खऱ्या लाभार्थ्यांवर अन्याय झाल्याची भावना तीव्र झाली आहे. आरटीई योजना ही समाजातील वंचित घटकांतील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने राबविण्यात आली आहे. मात्र, या योजनेतच भ्रष्टाचार शिरल्यामुळे तिचा मूळ हेतू धोक्यात आल्याचे चित्र आहे. पालकांमध्ये तीव्र नाराजी असून "सरकारी योजना केवळ कागदावरच राहिल्या आहेत का?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया असूनही तांत्रिक त्रुटी, अपुरी डेटा पडताळणी आणि नियंत्रण यंत्रणेचा अभाव यामुळे गैरप्रकारांना वाव मिळत असल्याचे समोर येत आहे. उत्पन्न दाखले, रहिवासी पुरावे यांची काटेकोर तपासणी न होणे ही या घोटाळ्याची प्रमुख कडी मानली जात आहे.

या सर्व घडामोडींमुळे शिक्षण विभागाच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला असून, आता दोषींवर कठोर कारवाई होणार का, तसेच अपात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. खऱ्या गरजू विद्यार्थ्यांचा हक्क परत मिळणार की भ्रष्टाचारच वरचढ ठरणार, हा प्रश्न सध्या पुणे जिल्ह्यातील पालक आणि नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

---

## पिंपरवाडीला एसटी बस पूर्ववत सुरू करा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नरहून हातवीजकडे जाणारी एसटी बस पूर्वीप्रमाणे पिंपरवाडी गावात येऊन पुढे जावी, या मागणीसाठी किसान सभेच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी जुन्नर आगाराच्या शाखा व्यवस्थापकांना निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिला.

सध्या ही बस पिंपरवाडी गावात न येता सुमारे एक किलोमीटर अंतरावरील बसथांब्यावर थांबून पुढे जात असल्याने ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रात्री मुक्कामी बस सुमारे ८ ते ८.३० वाजण्याच्या सुमारास येत असल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच आसपासच्या गावांतील प्रवाशांना अंधारात पायी प्रवास करावा लागत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी बस सेवा पूर्ववत गावात सुरू करावी, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

शाखा व्यवस्थापकांनी ग्रामस्थांशी चर्चा करत २४ एप्रिलपासून मुक्कामी एसटी बस पिंपरवाडी गावात येईल, असे आश्वासन दिले. या वेळी किसान सभेचे तालुका सचिव लक्ष्मण जोशी, माकपचे तालुका सचिव गणपत घोडे, आदिवासी अधिकार मंचाचे संजय साबळे, पिंपरवाडीच्या सरपंच मंगलताई चिमटे, सदस्य मुकुंद घोडे, जयश्री घोडे, नारायण वायाळ, कोंडीभाऊ बांबळे, रामदास घोडे, शंकर डामसे, भोरू चिमटे, गोविंद घोडे, बाळू घोडे, किसन डामसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## महात्मा गांधी विद्यालयाला 'विशेष मानांकन' प्राप्त

**इयत्ता ५ वी ते १२ गटासाठी निवड**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ आणि पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान २०२५-२६ अंतर्गत खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयास इयत्ता ५ वी ते १२ वी गटात 'विशेष स्तर' मानांकन प्राप्त झाले आहे.

स्वारगेट, पुणे येथील गणेश कला क्रीडा मंच येथे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर, पुणे विभागाचे उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, मुख्याध्यापक संघाचे राज्य सचिव नंदकुमार सागर तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते विद्यालयास सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

संस्थेच्या वतीने संचालिका रेखाताई श्रोत्रिय, विद्यालयाच्या प्राचार्या संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव तसेच हौशीराम मुठे, सुनीता ठाकूर, लतीफ शाह, संदेश जाधव यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत आणि मानद सचिव गणेश जोशी यांनी या यशाबद्दल विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

---

## नगरपरिषदेच्या दारात नोकरीसाठी आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** सफाई कामगार असलेल्या आईचे निधन झाल्यानंतर त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळावी आणि त्यासाठी नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर करावा, या मागणीसाठी पंकज एकनाथ गायकवाड व त्यांची पत्नी सविता गायकवाड यांनी राजगुरुनगर नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारात गुरुवारी (दि. २३) उपोषण आंदोलन सुरू केले आहे.



छायाचित्र : निखिल पाचारणे

या आंदोलनात आम आदमी पक्षाचे स्वप्नील गायकवाड यांनीही सहभाग घेतला असून, न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे. नगरपरिषदेच्या दारात सुरू झालेल्या या आंदोलनाची शहरात चर्चा रंगली आहे. शुक्रवारी आंदोलनाचा दुसरा दिवस असून, नगराध्यक्ष, नगरसेवक किंवा मुख्याधिकारी यांपैकी कोणीही साधी चौकशीदेखील केली नसल्याचा आरोप करत स्वप्नील गायकवाड यांनी पदाधिकारी व अधिकाऱ्यांचा निषेध केला.

नगरपरिषदेतील सफाई कामगार सरिता एकनाथ गायकवाड यांचे ८ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. त्यांच्या मुलगा पंकज गायकवाड याला अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, अनेक वेळा निवेदने देऊनही तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश देऊनही नगरपरिषदेने प्रस्ताव तयार केला नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

हतबल झालेल्या गायकवाड दाम्पत्याने नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारात साखळी उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. यापूर्वीही त्यांनी आंदोलन केले होते.

दरम्यान, मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी सांगितले की, संबंधित पद नगरपरिषदेच्या मंजूर कामगार पदांमध्ये समाविष्ट नसल्याने प्रस्ताव तयार करण्यात आलेला नाही. याबाबतची माहिती आंदोलक आणि पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.


---

**चाकण अपर तहसील कार्यालयावरून राजकारण तापले**

# खेडमध्ये आजी-माजी आमदार आमनेसामने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** चाकण येथे अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्याच्या निर्णयावरून खेड तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राज्य शासनाने नागरिकांच्या महसूल विषयक अडचणी जलद सोडवण्यासाठी चाकण येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची घोषणा केली असून, त्यासंदर्भातील अधिसूचना नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. मात्र या निर्णयावरून सत्ताधारी



व विरोधी गटांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप मोहिते-पाटील यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे आमदार बाबाजी काळे यांनी चाकण येथील प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाला विरोध केल्याचा आरोप केला आहे. काळे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र देत कार्यालय कडूस येथे स्थलांतरित करण्याची मागणी केल्याचा दावा मोहिते-पाटील यांनी केला.

दरम्यान, या आरोपांना प्रत्युत्तर देताना आमदार बाबाजी काळे यांच्या समर्थकांनी सोशल मीडियावर पत्रक प्रसिद्ध करत हे आरोप फेटाळले आहेत. चाकण येथे अप्पर तहसील कार्यालयाला कोणताही विरोध नसून, उलट या कार्यालयासाठी आपणच विधिमंडळात मागणी केल्याचा दावा त्यांनी केला. मोठ्या भौगोलिक क्षेत्र असलेल्या खेड तालुक्यात मुख्य तहसील कार्यालयासोबत दोन अप्पर तहसील कार्यालये असण्याची गरज असल्याचे मत काळे यांनी व्यक्त केले आहे.

या वादाच्या पार्श्वभूमीवर चाकण येथे एका रस्त्याच्या कामावरूनही राजकीय श्रेयवाद रंगला. बुधवारी (दि. २२) माजी आमदार दिलीप मोहिते-पाटील यांच्या हस्ते रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले. यापूर्वी या कामाचे भूमिपूजन माजी आमदार स्व. सुरेश गोरे यांच्या पत्नी व नगराध्यक्ष मनीषा गोरे यांच्या हस्ते झाले होते. त्यानंतर काही दिवसांपूर्वी पुन्हा आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते आणि नगराध्यक्षांच्या उपस्थितीत भूमिपूजन पार पडले. एकाच कामाचे वारंवार भूमिपूजन झाल्याने स्थानिक पातळीवर चर्चा रंगली असून, दोन्ही नेत्यांकडून एकमेकांवर जोरदार टीका करण्यात आली. या वादानंतर दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते सोशल मीडियावर सक्रिय झाले असून, आपापल्या नेत्यांच्या समर्थनार्थ आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. या सर्व घडामोडींमुळे खेड तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून, आगामी काळात हा वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

## ऊसतोड मजूर पुरवठ्याच्या आमिषाने फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर :** तालुक्यातील रावडेवाडी येथील पराग ॲग्रो फुड्स ॲण्ड अलाईड प्रॉडक्ट्स प्रा. लि. साखर कारखान्याची २४ लाख ३८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ऊसतोड मजूर पुरविण्याचे आमिष दाखवत आरोपींनी हा आर्थिक घोटाळा केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी राहुल रामदास भाकरे (वय ३६, रा. माळवाडी, टाकळी हाजी) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गोरख भारमल राठोड, नितीन तुळशीराम चव्हाण आणि ज्ञानेश्वर गबरू राठोड (सर्व रा. घोडेगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी ऊसतोड मजूर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देत फिर्यादीसोबत लेखी करार केला आणि त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर वेगवेगळ्या कारणांखाली आरोपींनी फिर्यादीकडून त्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करून घेतली. यामध्ये गोरख राठोड याने ८ लाख १८ हजार रुपये, नितीन चव्हाण याने ४ लाख ८६ हजार रुपये तर ज्ञानेश्वर राठोड याने ११ लाख ३४ हजार रुपये घेतल्याचे समोर आले आहे. या तिघांनी मिळून एकूण २४ लाख ३८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

## सारांश वृत्त

### स्टडी व्हिसाच्या नावाखाली फसवणूक

**बिलासपूर:** परदेशात शिक्षणासाठी स्टडी व्हिसा मिळवून देण्याच्या बहाण्याने एका तरुणाची २० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. निशांत ठाकूर यांनी आरोप केला आहे की, बिलासपूर येथील रहिवासी असलेल्या अभिषेक कुमार शर्मा आणि मुनीश शर्मा या दोन आरोपींनी त्यांच्याकडून २०,४१,३६४ रुपये घेतले आणि त्यांना स्टडी व्हिसा देण्याचे आश्वासन दिले होते.

### टीएमसीकडून भाजप कार्यकर्त्याला धमकी

**कोलकाता** : भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी शुक्रवारी आरोप केला की, दक्षिण कोलकाता येथील त्यांच्या निवासस्थानी सत्ताधारी टीएमसी समर्थकांकडून एका भाजप कार्यकर्त्याला धमकावण्यात आले आणि भारतीय निवडणूक आयोगाने यावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी केली. एक्स वरील एका पोस्टमध्ये अधिकारी यांनी दावा केला आहे की, पक्षासाठी घरोघरी प्रचार करत असल्यामुळे भाजप कार्यकर्त्या बिना दास यांना गुंडांच्या एका गटाने लक्ष्य केले, ज्यांनी बुधवारी रात्री त्यांच्या घराला घेराव घातला आणि त्यांचा छळ केला. हा विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रकार आहे, असा आरोप त्यांनी केला.

### हैदराबादमध्ये चहा भेसळीचे रॅकेट उघड

**हैदराबाद** : एच-फास्टने येथे चहा पावडरमधील भेसळ करणाऱ्या एका रॅकेटचा पर्दाफाश केला आणि १० जणांना अटक केली, अशी माहिती पोलिसांनी दिली. तपासात असे उघड झाले की, काही आरोपी पदार्थाचे स्वरूप सुधारण्यासाठी आणि नफा वाढवण्यासाठी त्यात कृत्रिम खाद्यरंग, गुळाचा रस आणि वापरलेली व मुदत संपलेली चहा पावडर मिसळत होते. चहा पावडरमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याच्या माहितीच्या आधारे, पथकाने भेसळयुक्त चहा पावडर तयार करणाऱ्या आणि पुरवठा करणाऱ्या उत्पादन युनिट्सना लक्ष्य केले.

## सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाला विधानसभेची मान्यता

# बिहारमध्ये विश्वासदर्शक ठराव मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** फेपटना मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने बिहार विधानसभेत आवाजी मतदानाने विश्वासदर्शक ठराव जिंकला. या निकालानंतर नवीन सरकारला अधिकृत मान्यता मिळाली असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय चढाओढ पाहायला मिळाली.

विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांनी सभागृहात विश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्याबद्दल नवीन सरकारचे अभिनंदन केले. या ठरावादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार चर्चा झाली. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करत विरोधकांच्या टीकेला उत्तर दिले. त्यांनी सांगितले की, १९९९ मध्ये राबडी देवी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये मंत्री म्हणून त्यांनी



आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. विरोधी पक्षनेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी केलेल्या 'लालू पाठशाळेचे उत्पादन' या टीकेला उत्तर देताना त्यांनी सत्ता ही कोणाचीही वैयक्तिक मालमत्ता नसल्याचे ठामपणे सांगितले.

लालू प्रसाद यादव यांच्याशी संबंधित काही जुन्या घटनांचा उल्लेख करत चौधरी यांनी स्वतःच्या राजकीय प्रवासावर प्रकाश टाकला. "त्या काळातील घटनांमुळेच मी राजकारणात आलो," असे ते म्हणाले. तसेच, "वैयक्तिक टीकेला वैयक्तिक उत्तर देण्यास आम्हीही तयार आहोत," असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, "मी मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा नितीश कुमार यांची होती," असेही चौधरी यांनी स्पष्ट केले. एनडीए सरकारने गेल्या दोन दशकांत बिहारमध्ये विकास, सुशासन, शेतकरी आणि महिलांच्या कल्याणाला प्राधान्य दिल्याचा दावा त्यांनी केला. "भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि साम्यवाद या 'ट्रिपल सी'वर कोणतीही तडजोड केली जाणार नाही," असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी या विशेष अधिवेशनाच्या गरजेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "भाजपने आधीच मुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय घेतला असता, तर या अधिवेशनाची गरज नव्हती," असा आरोप त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा यांनी नवीन सरकार नितीश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करेल, असे स्पष्ट केले. नितीश कुमार राज्यसभेचे सदस्य झाले असले तरी ते बिहारच्या विकासकामांवर लक्ष ठेवतील, असेही त्यांनी नमूद केले. विश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर बिहारमधील राजकीय परिस्थिती अधिक स्पष्ट झाली असली, तरी सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष पुढील काळातही कायम राहण्याची चिन्हे आहेत.

## टीएमसीचा 'अंत' निश्चित पंतप्रधान नरेंद्र मोदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाणीहाटी :** पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या प्रचंड मतदानाने तृणमूल काँग्रेस (टीएमसी) सत्तेचा 'अंत' निश्चित झाला असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. बदलाच्या अटळ लाटेसमोर सत्ताधारी पक्षाने धैर्य गमावले असून जनतेने भाजपच्या बाजूने कौल दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाणीहाटी येथील निवडणूक सभेत बोलताना मोदी म्हणाले की, पहिल्या टप्प्यातील मतदानाने बंगालमध्ये परिवर्तनाची लाट स्पष्टपणे दिसून आली आहे. "कालच्या मतदानाने टीएमसीच्या 'महा जंगलराज'चा शेवट ठरवला आहे. हा काळ भ्रष्टाचार, गैरकारभार आणि घुसखोरीच्या प्रभावाने गाजलेला होता," असा आरोप त्यांनी केला. मोदी यांनी दावा केला की, जनतेच्या प्रचंड सहभागामुळे भाजपच्या विजयाचा शंखनाद झाला असून ४ मे रोजी निकालानंतर राज्यात मोठा राजकीय बदल पाहायला



मिळेल. "टीएमसीच्या गुंडांना लपण्यासाठी जागा उरणार नाही. कायद्यापासून त्यांचे रक्षण करणारे कोणीही नसेल," असा इशाराही त्यांनी दिला.

महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत मोदी यांनी टीएमसीवर 'महिला-विरोधी' पक्ष असल्याचा आरोप केला. भाजपच्या 'महिला-नेतृत्व विकास' धोरणाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, अन्यायग्रस्त महिलांना उमेदवारी देऊन पक्षाने त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. आर. जी. कर प्रकरणातील पीडितेच्या आईला उमेदवारी दिल्याचा उल्लेख करत, "ज्यांच्यावर अन्याय झाला, त्यांनाच नेतृत्वाची संधी दिली," असे ते म्हणाले. तसेच संदेशखाली प्रकरणातील पीडितेलाही भाजपने पुढे आणल्याचे त्यांनी सांगितले.

## धनबादमध्ये जमीन खचली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**धनबाद :** धनबाद जिल्ह्यातील सोनारडीह ओपी हद्दीतील तांदबारी वस्तीमध्ये जमीन खचल्याने २१ हून अधिक घरे कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. गुरुवारी रात्री सुमारे ९ वाजता मोठा आवाज होताच ही दुर्घटना घडली असून, अनेक घरे १५ ते २० फूट खोल जमिनीत गाडली गेली. या घटनेत चार जण जखमी झाले असून, त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. जखमींना तातडीने धनबाद येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरात भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मोठा आवाज ऐकून नागरिकांनी जीव वाचवण्यासाठी घराबाहेर धाव घेतली.

घटनेची माहिती मिळताच प्रशासन आणि बीसीसीएलचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बाधित नागरिकांसाठी तात्पुरते शिबिर उभारण्यात आले असून, त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत २७ कुटुंबांना बेलगरिया येथे स्थलांतरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

प्रशासनाने हा परिसर अत्यंत धोकादायक असल्याचे मान्य केले असून, पुढील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने स्थलांतर आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, संतप्त ग्रामस्थांनी या घटनेसाठी कोळसा खाणकामाला जबाबदार धरत बीसीसीएल व्यवस्थापनावर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे.

स्थानिकांच्या मते, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या खाणकामामुळे जमिनीचा पाया आतून पोखरला गेला असून, त्यामुळे वारंवार भूस्खलनाच्या घटना घडत आहेत. यापूर्वी ३१ मार्च रोजी झालेल्या अशाच एका घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## अल्पवयीन मुलीला गर्भपाताची परवानगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला सात महिन्यांहून अधिक काळाच्या गर्भाचा वैद्यकीय गर्भपात करण्यास परवानगी देत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. कोणत्याही महिलेला, विशेषतः अल्पवयीन मुलीला, तिच्या इच्छेविरुद्ध गर्भधारणा करण्यास भाग पाडता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने प्रजनन स्वायत्ततेचा हक्क अधोरेखित केला.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना महिलेच्या निवडीला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे, असे ठामपणे नमूद केले. गर्भातील बाळाच्या हक्कांपेक्षा गर्भवती महिलेची इच्छा आणि तिचे आरोग्य अधिक महत्त्वाचे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, अनपेक्षित गर्भधारणा विशेषतः अल्पवयीन मुलींसाठी मानसिक, शारीरिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या गंभीर परिणाम करणारी ठरू शकते. अशी गर्भधारणा जबरदस्तीने सुरू ठेवण्यास भाग पाडल्यास तिच्या सर्वांगीण विकासावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता आहे.

न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत प्रजनन स्वायत्तता ही वैयक्तिक स्वातंत्र्य आणि गोपनीयतेचा अविभाज्य भाग असल्याचे पुन्हा अधोरेखित केले. एखाद्या महिलेला नको असलेली गर्भधारणा चालू ठेवण्यास भाग पाडणे हे तिच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन ठरते, असेही स्पष्ट करण्यात आले. "कोणत्याही न्यायालयाने महिलेला किंवा अल्पवयीन मुलीला तिच्या इच्छेविरुद्ध गर्भधारणा पूर्ण करण्यास भाग पाडू नये. अशी सक्ती केवळ तिच्या निर्णयस्वातंत्र्याचा भंग करत नाही, तर तिला गंभीर मानसिक व शारीरिक आघाताला सामोरे जावे लागू शकते," असे खंडपीठाने नमूद केले. याचिकेदरम्यान मांडण्यात आलेला 'जन्मानंतर मुलाला दत्तक देण्याचा' पर्याय न्यायालयाने फेटाळून लावला. गर्भधारणा चालू ठेवण्याचा निर्णय हा केवळ महिलेचा असावा, आणि तिच्या इच्छेविरुद्ध कोणताही पर्याय लादता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, जर न्यायालये गर्भपाताला परवानगी देण्यास नकार देत राहिली, तर महिलांना बेकायदेशीर आणि असुरक्षित मार्गांचा अवलंब करावा लागू शकतो, ज्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. अल्पवयीन मुलीचे वय, गर्भधारणेचे अनपेक्षित स्वरूप आणि तिच्या मानसिक स्थितीचा विचार करून न्यायालयाने हा निर्णय दिला.

## बंगालमध्ये 'हुकूमशाही' लादण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर तीव्र टीका करत राज्याचे राजकारण 'हुकूमशाहीने लादण्याचा', लोकांमध्ये फूट पाडण्याचा आणि बंगालची संस्कृती विकृत करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. अशा कोणत्याही प्रयत्नांना लोकशाही मार्गाने ठाम विरोध केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी 'एक्स'वरील पोस्टमधून ममता बॅनर्जी यांनी हा हल्लाबोल केला. बंगालची ओळख जपण्याच्या निर्धारातूनच मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याचे त्यांनी नमूद केले. राज्याचा कारभार दिल्लीहून चालवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा मोठा गैरसमज असल्याचे सांगत त्यांनी केंद्र सरकारवर अप्रत्यक्ष निशाणा साधला.

चौरंगी, भवानीपूर, जादवपूर आणि टॉलीगंज परिसरातील नागरिकांचा उत्साह पाहून बंगालची एकजूट आणि ठाम भूमिका दिसून येत असल्याचे त्यांनी म्हटले. "बंगालची स्मरणशक्ती दीर्घ आहे आणि त्याचा कणा मजबूत आहे," असे सांगत राज्याला कमकुवत करण्याच्या प्रयत्नांना जनता मतपेटीतूनच उत्तर देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भाजप बंगालचे हक्क हिरावून घेण्याचा आणि आपला अजेंडा लादण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत, ही निवडणूक म्हणजे त्या प्रयत्नांविरोधातील लढा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "बंगालला कमकुवत करण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला निर्णायक लोकशाही प्रतिसाद दिला जाईल," असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. नागरिकांनी मतभेद विसरून बंगालच्या अस्मितेसाठी एकजुटीने मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## करूर अव्वल, कन्याकुमारीत सर्वात कमी टक्का

# तामिळनाडूत ८५.१५% मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत गुरुवारी झालेल्या मतदानाची तात्पुरती टक्केवारी ८५.१५ इतकी नोंदवण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, करूर आणि सालेम जिल्ह्यांत ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले असून, करूर जिल्हा ९२.६३ टक्क्यांसह राज्यात अव्वल ठरला आहे.

सालेम जिल्ह्यात ९०.७६ टक्के मतदान झाले, तर कन्याकुमारी जिल्ह्यात सर्वात कमी ७५.६१ टक्के मतदानाची नोंद झाली. राजधानी चेन्नईमध्ये पेरांबूर मतदारसंघात सर्वाधिक ८९.७३ टक्के मतदान झाले, तर मायलापूरमध्ये सर्वात कमी ७४.८९ टक्के मतदान झाले.

कोलाथूर मतदारसंघात, जिथून मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन निवडणूक लढवत आहेत, तेथे ८६.११ टक्के मतदान झाले. चेपॉक-थिरुवल्लिकेनीमध्ये ८४.३४ टक्के मतदानाची नोंद झाली. सालेममधील इडाप्पाडी मतदारसंघात ९२.०९ टक्के मतदान झाले असून, येथे माजी



मुख्यमंत्री एडप्पाडी के. पलानीस्वामी रिंगणात आहेत. तिरुचिरापल्ली पूर्वमध्ये अभिनेते-राजकारणी विजय निवडणूक लढवत असून, येथे सायंकाळी ६ वाजेपर्यंत ८९.७७ टक्के मतदान झाले होते. शिवगंगा जिल्ह्यातील कराईकुडी मतदारसंघात ७४.३३ टक्के मतदान झाले आहे.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की, ही आकडेवारी तात्पुरती असून काही मतदान केंद्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार तयार करण्यात आली आहे. पोस्टल मतांची गणना यामध्ये समाविष्ट नसून, अंतिम आकडेवारीत त्याचा समावेश केला जाईल. प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदानाची नोंद 'फॉर्म १७ सी'मध्ये केली जात असून, त्याची स्वतंत्र पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. पुरुष, महिला आणि तृतीयपंथी मतदारांचा समावेश असलेली अंतिम आकडेवारी लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्यातील २३४ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान पार पडले असून, ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. सत्ताधारी द्रमुक आघाडी सत्ता कायम राखण्याच्या प्रयत्नात आहे, तर अण्णाद्रमुक-भाजप आघाडी पुनरागमनासाठी प्रयत्नशील आहे. अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके पक्षही या निवडणुकीत महत्त्वाचा घटक ठरत आहे.

## नावे वगळल्याप्रकरणी याचिका फेटाळल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान नावे वगळण्यात आल्याच्या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या. यामध्ये ६५ निवडणूक कर्तव्य अधिकाऱ्यांसह काही व्यक्तींचा समावेश होता. या प्रकरणाची सुनावणी अपीलीय न्यायाधिकरणाने करावी, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले.

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या उपस्थितीत, याचिकांवर थेट हस्तक्षेप करण्यास नकार दिला. याचिकाकर्त्यांनी मतदार यादीतून नावे वगळल्याबाबत मनमानी झाल्याचा आरोप केला होता.

याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील एम. आर. शमशाद यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांची नावेही कोणतेही कारण न देता यादीतून हटवण्यात आली आहेत. "ईपीआयसी क्रमांक असतानाही ते वगळण्यात आले, त्यामुळे निवडणुका घेणारे अधिकारीच मतदानापासून वंचित राहिले आहेत," असे त्यांनी न्यायालयात नमूद केले. मात्र, न्यायालयाने हे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर, संबंधितांनी आपली तक्रार अपीलीय न्यायाधिकरणासमोर मांडावी, असे सांगितले. "न्यायाधिकरण याबाबत योग्य ती तपासणी करून निर्णय देईल," असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. न्यायमूर्ती बागची यांनी निरीक्षण नोंदवताना सांगितले की, सध्या सुरू असलेल्या निवडणुकांदरम्यान काही जणांना मतदान करता येणार नसले तरी, त्यांना पुढे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी न्यायाधिकरणात दाद मागता येईल.

सर्वोच्च न्यायालयाने संबंधितांना कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडेही प्रशासकीय किंवा न्यायालयीन पातळीवर दाद मागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. तसेच, अपीलीय न्यायाधिकरणांना निर्देश देत तातडीची गरज सिद्ध करणाऱ्या प्रकरणांना प्राधान्याने सुनावणी देण्यास सांगितले आहे.

## अमली पदार्थ तस्करांची घरे पाडली

**जम्मू :** अमली पदार्थांची तस्करी आणि व्यापारात गुंतलेल्या व्यक्तींच्या मालमत्तेविरुद्ध सुरू असलेल्या कारवाईचा एक भाग म्हणून, जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी जम्मू शहराच्या बाहेरील भागात दोन कथित अमली पदार्थ तस्करांच्या निवासी मालमत्ता पाडल्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मोठ्या पोलीस बंदोबस्तात बुलडोझर मिरान साहिबच्या इंद्रा नगर कॉलनीत दाखल झाले आणि त्यांनी परिसरातील दोन अमली पदार्थ विक्रेत्यांची घरे जमीनदोस्त केली, असे त्यांनी सांगितले.

## राघव चड्ढा भाजपमध्ये; आपला धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे, कारण पक्षाचे तीन राज्यसभा खासदार - राघव चड्ढा, संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांनी शुक्रवारी पक्ष सोडून भाजपमध्ये सामील होण्याची घोषणा केली.

शुक्रवारी पत्रकार परिषदेला संबोधित करताना राघव चड्ढा म्हणाले की, राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे माजी प्रतिनिधी घटनात्मक तरतुदींचा वापर करून भाजपमध्ये विलीन होत आहेत. "राज्यसभेतील 'आप'चे दोन-तृतीयांश सदस्य म्हणून आम्ही भारताच्या संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे," असे चड्ढा



म्हणाले.

राघव चड्ढा यांच्या म्हणण्यानुसार, हरभजन सिंग, राजिंदर गुप्ता, विक्रम सहानी आणि स्वाती मालीवाल यांनीही पक्ष सोडला असून ते भाजपमध्ये सामील होत आहेत. "राज्यसभेत 'आप'चे १० खासदार आहेत, त्यापैकी दोन-तृतीयांशपेक्षा जास्त आमच्यासोबत आहेत. त्यांनी स्वाक्षरी केली असून, आज सकाळी आम्ही स्वाक्षरी केलेले पत्र आणि कागदपत्रे राज्यसभेच्या अध्यक्षांना सादर केली आहेत, असे त्यांनी सांगितले.

## गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींनाही संधी, काँग्रेसची तीव्र टीका

# गुजरातमध्ये मतदान प्रतिनिधींवरील निर्बंध शिथिल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरात राज्य निवडणूक आयोगाने मतदान प्रतिनिधींबाबतचा एक महत्त्वाचा निर्णय मागे घेतल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना मतदान, निवडणूक आणि मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यावर असलेली बंदी हटवल्याने काँग्रेसने तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २३ एप्रिल रोजी जारी केलेल्या नव्या परिपत्रकाद्वारे पूर्वीच्या आदेशातील एक महत्त्वाची अट



रद्द केली आहे. यापूर्वी मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त होणाऱ्या व्यक्तींची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसावी, असा स्पष्ट नियम होता. मात्र, सुधारित आदेशानुसार ही अट हटवण्यात आली असून इतर पात्रता व अपात्रतेचे निकष कायम ठेवण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे काँग्रेस पक्षाने आयोगावर जोरदार टीका केली आहे. गुजरात काँग्रेसचे अध्यक्ष अमित चावडा आणि उपाध्यक्ष हेमांग वासवदा यांनी आयोगाला लेखी निवेदन देत हा आदेश तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेत बाहुबली प्रवृत्तीच्या व्यक्तींना वाव मिळू शकतो, ज्यामुळे मतदान केंद्रांवरील वातावरणावर परिणाम होण्याची भीती आहे.

काँग्रेसने आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, मतदान प्रतिनिधी हे प्रत्येक उमेदवाराचे अधिकृत प्रतिनिधी असतात आणि मतदान प्रक्रियेवर देखरेख ठेवण्याची त्यांची जबाबदारी असते. अशा संवेदनशील भूमिकेत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना परवानगी देणे म्हणजे निवडणुकीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय.

पक्षाने इशारा दिला आहे की, अशा नियुक्त्यांमुळे मतदान कर्मचारी आणि इतर प्रतिनिधींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते, ज्यामुळे मुक्त व निष्पक्ष निवडणुकांच्या तत्त्वांना धक्का बसू शकतो. "लोकशाहीचा पाया असलेल्या निवडणुका निष्पक्ष आणि पारदर्शक असणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे संपूर्ण प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे," असे काँग्रेसने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, पंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर हा निर्णय घेण्यात आल्याने त्याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विरोधकांच्या आक्षेपांनंतर आयोग यावर पुनर्विचार करणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.